235

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi Part - II | January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.

236

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय लोकशाहीचे स्वरुप व त्यापुढील दहशतवादाचे आव्हान - एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. श्यामसुंदर वाघमारे** | १-४ |
| २ | भिल्ल आदिवासी स्त्रियांच्या शैक्षणिक समस्या (संदर्भ : किनवट तालुका)<br>**प्रा. डॉ. विजया साखरे** | ५-८ |
| ३ | खेळ जगतात संघटन व प्रशासनाचे महत्व<br>**प्रा. डॉ. जुझारसिंघ निर्मलसिंघ सिलेदार** | ९-१० |
| ४ | भारतीय समाजरचनेती लिंग असमानता : एक सामाजिक समस्या<br>**प्रा. डॉ. संभाजी नारायणराव कबाडी** | ११-१३ |
| ५ | सांप्रदायिकता : समस्या व उपाय<br>**प्रा. सुभाष रामराव रगडे** | १४-१८ |
| ६ | भारतीय लोकशाही व आर्थिक सुधारणा<br>**डॉ. चंद्रकांत वामनराव गजेवाड** | १९-२२ |
| ७ | विस्थापनाचा स्त्रियांवर झालेला परिणाम (संदर्भ लोअर दुधना प्रकल्प)<br>**प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे** | २३-२७ |
| ८ | भारतीय समाजातील स्त्री समस्या - स्त्रीभ्रूणहत्या एक अवलोकन<br>**प्रा. गजानन आनंता देवकर** | २८-३१ |
| ९ | लोकशाहीचा सिध्दांत आणि भारतीय लोकशाहीच्या संदर्भातील निरीक्षणे<br>**प्रा. डॉ. रामचंद्र गायकवाड** | ३२-४२ |
| १० | भारतीय लोकशाही समोरील आव्हान : पर्यावरण संवर्धन<br>**डॉ. गंगणे जीवन सुदामराव** | ४३-४७ |
| ११ | भारतीय अनुसूचित जातींच्या सामाजिक व आर्थिक समस्या<br>**प्रा. डॉ. गोरे बी. एम.** | ४८-५० |
| १२ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाणे<br>**प्रा. डॉ. हिंगोले आर. जी.** | ५१-५४ |
| १३ | समाजातील अल्पसंख्याकांच्या समस्या<br>**डॉ. जीवन ए. चव्हाण** | ५५-५८ |




LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq, Biloli
Dist. Nanded.

10. किरकोळ व्यापार

आर्थिक सुधारणा काळात किरकोळ व्यापारक्षेत्राने मोठीकामगीरीबजावलेली आहे. भारत ही जगातील वेगानेविकसीत होणारी एकमेव किरकोळ बाजारपेठ आहे. सध्या भारतातील किरकोळ व्यापारातई-कॉमर्स चा वाटा 32.7 दशलक्षडॉलर आहे तो 2022 या वर्षा पर्यंत 71.9 दशलक्षडॉलर्स पर्यंतजाण्याची शक्यता आहे.

11. प्रत्यक्षविदेशीगुंतवणुक

आर्थिकसुधारणाकार्यक्रमा अंतर्गत शासनाने वेळोवेळी विदेशी गुंतवणुकीला चालना दिलेली आहे परिणामी देशाच्या विविध क्षेत्रामध्ये विदेशी गुंतवणुकीचा प्रवाह वाढत आहे. वर्ष 2000 ते 2010 काळात देशात 178 दशलक्ष डॉलर्स एवढीविदेशी गुंतवणुक झाली तरत्यानंतर 2016 ते 2017 या एकाच वर्षात हि गुंतवणुक 60.1 दशलक्षडॉलर्सएवढी झाली.

**अनुमान**

आंतरराष्ट्रीय आर्थिक पर्यावरण व देशातील अंतर्गतगरजा लक्षातघेतादेशातील कोणत्याही शासनाला आर्थिक सुधारणाकार्यक्रमापासुन मागे हटणे शक्य नाही. भाविकाळात भारताला आर्थिक महाशक्ती बनवायचे असेलतर सुयोग्य आर्थिकनियोजनात योग्यते प्रभावी बदलकरणे आवश्यक आहे. भारतीयनागरीकांच्यादृष्टीकोणात व देशातील असलेल्या आर्थिकक्षमतेचा व मनुष्यकाळाचा योग्य वापरकरुनघेणेआवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून मा. प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी भारतीयनियोजन आयोगाच्याठिकाणीनवीन प्रारुपातनिती आयोग स्थापनकेलेला आहे. यातुन भारताचा चांगला आर्थिकविकासहोईल अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ सुची**

1. डॉ. काकडे, प्रा. पाचपोर"भारतीय अर्थव्यवस्था", साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुलै 2014 पेज 71-85.
2. डॉ. एस. के. ढगे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, के. एस. पब्लीकेशन, पुणे, सप्टेंबर 2015 पेज 191-213.
3. डॉ. पांचाळ पि. व्हि., भारतीय व्यापार व उद्योजकतेचा ईतिहास, अरुणा प्रकाशन, लातुर, फेब्रुवारी 2016 पेज 181-183.
4. डॉ. ए. जाधव डॉ. आर. एस. पाटील, "भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने", (भारतीय अर्थव्यस्थेपुढील आव्हाने), हर्षवर्धन पब्लीकेशन, लिंबगणेश, फेब्रुवारी 2015 पेज 85-88.
5. www.wikipedia, "Economic Liberalization in India", last visted on 15 Feb. 2019.
6. www.wikipedia, "Economy of India," last visited on 15 Feb. 2019.

LECTURER
ARTS COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli





# ७. विस्थापनाचा स्त्रियांवर झालेला परिणाम (संदर्भ लोअर दुधना प्रकल्प)

**प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे**
सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर ता. बिलोली जि. नांदेड.

**सारांश (Abstract)**

विकासाची प्रक्रिया न थांबविता विस्थापितांच्या प्रश्नांची तीव्रता निर्माण हाऊ नये आणि चिरंजीव विकास व्हावा म्हणून काय करता येईल? हा विचारवंतासमोर असणारा खरा प्रश्न आहे. विस्थापितांचे पुनर्वसन हा एक मानवी प्रश्न आहे. तो सहानुभूती, काळजी व निष्ठेने हाताळावयाचा विषय आहे. पुनर्वसन आर्थिक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय असे बहुविध आयाम आहेत. प्रस्तुत शोध निबंधामध्ये विस्थापणामुळे 'स्त्री' वर्गावर कशा पध्दतीचा परिणाम झालेला आहे? हे मांडण्याचा वस्तुनिष्ठ प्रयत्न केला आहे.

**सूचक शब्द (Keywords):** भारतीय समाज, विस्थापन, लोअर दुधना, स्त्री, विकासात्म समस्या, पुनर्वसन, लोकसंख्या, चिरंजीव विकास, संरचनात्मक बदल, आर्थिक वृध्दी, विस्थापीत कुटुंब, पितृसत्ताक, दिनक्रम, आरोग्य, मनोरंजन, इत्यादी.

**प्रस्तावना**

आज जगामधील सर्व देशामध्ये विकासाची प्रक्रिया सुरु आहे. विकासाची संकल्पना सर्व प्रथम पाश्चिमात्य देशामध्ये निर्माण झाली. आर्थिक विकासाची विभिन्न सिध्दांताची निर्मिती व त्यांचा प्रचार-प्रसार ही महायुध्दोत्तर काळातील घटना होय. १९५० च्या दशकात म्हणजे आरंभीच्या काळात प्रगत राष्ट्रे व अप्रगत राष्ट्रे यांच्यातील तफावत दर्शविण्यासाठी विकास या संकल्पनेचा उपयोग करण्यात आला. अल्पकाळातच व्यक्ती हितासाठी अथवा कल्याणसाठी जीवनाच्या विभिन्न क्षेत्रात सुधारणात्मक बदल धडवून आणण्याची आवश्कता आहे. सूधारणांचे फायदे संपुर्ण समाजाला मिळाले पाहिजे. विकास ही संकल्पना साधारणत: आर्थिक वृध्दी +संरचनात्मक बदल = विकास अशी आहे.

सध्या विकासाच्या प्रवाहामध्ये चिरंजीवी विकासासाठी एखादे प्रतिमान शोधत असतानाच `विस्थापन` आणि विस्थापनामुळे करावे लागणारे 'पुनर्वसन' या दोन्ही ही समस्यांना आता वेगळेच महत्व प्राप्त झाले आहे. आता पर्यंतचा विकास प्रकल्पामुळे होणाऱ्या विस्थापन आणि पुनर्वसनाचा जो इतिहास आहे तो तितकासा समाधानकारक नाही. उपलब्ध साहित्याचा मागोवा घेता, विस्थापन आणि पुनर्वसन प्रक्रिया ही विस्थापित कुटुंबासाठी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, मानसिक दृष्ट्या घातक ठरली आहे.

अशा विस्थापित कुटुंबाममील सर्वच सदस्य कमी अधिक प्रमाणात तोंड देत असले तरी, महिला सदस्यांवर याप्रसंगी फारच ताण येतो. पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेमध्ये कुटुंबाची अंतर्गत जबाबदारी ही जवळजवळ 'स्त्री' सदस्यांचीच असते



231

विस्थापनामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन तणावग्रस्त बनते. कुटूंबाची अर्थव्यवस्था कोलमडते. व्यवसायामध्ये मोठा बदल घडुन येतो. अर्थिक स्थिती खालावते, तसेच सामाजिक बंध कमकुवत होतात. या सर्व परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या चिंता, ताण-तणाव यांना मुख्यत्वे स्त्रीलाच सामोरे जावे लागते.

अशा परिस्थितीत खचुन गेलेल्या वयस्क मंडळीबरोबर जमवून घेणे, मुलाचे पालनपोषन करणे, लाकुडफाटा गोळा करणे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, घरगुती सर्व कामे सांभाळून मोल मजूरीला जाणे या सर्व गोष्टी कराव्या लागतात. थोडक्यात, विस्थिापित स्त्रीला अतिशय खडतर जीवनाला सामोर जावे लागते.

**विस्थापनाचा लोअर दुधना प्रकल्पाचा स्त्रियांवर झालेला परिणाम**

**अलगता आणि असुरक्षिततेची भावना**

लोअर दुधना प्रकल्पग्रस्त स्त्रीवर विस्थापनाचा परिणाम हा तेथील पुरुष सदस्यापेक्षा निश्चितच वेगळा असलेला दिसून येतो. पुरुष सदस्य विशेषतः धरणाखाली गेलेली जमीन व मालमत्ता याबाबतीत चिंता करतांना दिसतो, तर स्त्री ही कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना कराव्या लागणाऱ्या सर्व लहान-सहान गोष्टींची चिंता करतांना दिसली. विस्थापनापूर्वीचे शांत, आरोग्यपूर्ण वातावरण, साधे जीवन यांची जागा चिंता, काळजी, चरितार्थाचे साधन शोधणे इत्यादींनी घेतलेली दिसते. प्रकल्पाच्या बांधकामास सुरुवात झाल्याने विस्थापित होण्याची भीती स्त्रियांना वाटु लागली. राहण्यासाठी जागा कुठे मिळेल? शेजारी कसे असतील? आपल्या पूर्वीच्या शेजाऱ्यांना भेटता येईल की नाही? नवे शेजारी कसे असतील? नविन जागा, नविन पर्यावरणाशी जुळवूनच घेता येईल किंवा नाही? या विषयीचे अनेक प्रश्न त्यांच्या समोर उभे होते.

हे सर्व प्रश्न मनात धरुनच ह्या स्त्रीया नविन पुर्वसित वसाहतीत आल्या. परंतु नव्या वातावरणामुळे या स्त्रियांच्यात अलगतेची व त्याचबरोबर असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती.

वाढती कौटुबिंक जबाबदारी

पितृसत्ताक कुटुंबव्यवस्थेमध्ये स्त्रीचे काम हे न दिसणारे आहे. अर्थातच घरामधील सर्व कामावर तिचा अधिकार असला तरी तिचा कुटुंबातील दर्जा हा दुय्यमच आहे. लिंगाधिष्टीत श्रमाचे विभाजन समाजाला नवीन नाही. विस्थापित स्त्री देखील अशाच प्रकाराचे जीवन जगताना दिसते. विस्थापनापुर्वी अन्नधान्याची सुबत्ता, शुध्द, स्वच्छ नदिचे मुबलक पाणी, ताजी फळे, फुले, भाजी पाला, दुध, दुग्धजन्य पदार्थ ह्यामुळे स्त्री जीवन तुलनात्मक दृष्ट्या चांगले होते. परंतु विस्थापनानंतरच्या काळात स्त्रीसाठी घरकाम आणि स्वयंपाक ह्या सर्वात कठीण गोष्ट बनली होती. तात्पुरत्या स्वरुपाच्या (तबुंवजा) घरामध्ये चुलीची व्यवस्था करणे, जळतन गोळा करणे, अन्नधान्याची सोय करणे, पाणवठा शोधुण काढून तेथून पाणी आणणे आणि या सर्व गोष्टींची पूर्तता झाल्यानंतर स्वयंपाक करणे ही गोष्ट तिच्यासाठी खूपच अवघड होती. परंतु जेव्हा पुनर्वसित वसाहतीत जागा दिल्यानंतर स्त्री येऊन राहू लागल्या तेव्हाही त्यांना काही समस्यांना सामोरे जावे लागले. यामध्ये विशेषतः आजपर्यंत त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न चांगल्या पध्दतीने सुटलेला नसल्याने त्यांना दूरवर जाऊन पाणी आणावे लागते. चुलीसाठी जळतन-लाकुडफाटा (सरपन), घरातील जनावरांसाठी चारा गोळा करावा लागला व त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli



लागली. या सर्वाबरोबर कुटुंबाची आर्थिक स्थिती बिघडलेली असल्याने मोलमजूरीसाठी जावे लागले. आज लोअर दूधना प्रकल्पांतर्गत मधील ७०% स्त्रिया शेतमजुरीसाठी जाताना दिसतात. अर्थातच यामुळे घराची जबाबदारी थोडीशी वयात आलेली घरातील मुलगी किंवा वयस्क वृध्द महिलांच्यावर येऊन पडली आहे.

विस्थापनानंतर काही वेळा नुकसान भरपाई न मिळालेल्या किंवा काही वेळा अपूरी नूकसान भरपाई मिळालेल्या कुटुंबातील स्त्रियांची स्थिती तर अधिकच बिकट झालेली दिसते. नुकसान भरपाईच्या स्वरूपात गेलेली शेतजमीन आणि पुरुष व्यक्तीला त्यामूळे आलेले रिकामेपणा याची परिणती मद्यपींच्या संख्येत वाढ झालेली असल्याने अशा मद्यपी पूरूषांच्या अत्याचारालाही स्त्रीया बळी पडतांना दिसत आहेत. असे मद्यपी पुरुष, स्त्रीने मिळालेल्या पैशाचा गैरवापर करतांना दिसत आहेत. याचाच अर्थ विस्थापनानंतर तिच्या कौटूंबीक जबाबदाऱ्या वाढल्या आहेत.

**दिनक्रमातील बदल**

विस्थापनापूर्वी स्त्रियांचे जीवन सापेक्षतःसाधे आणि सुखकारक होते. पहाटे उठणे, अंगणे झाडणे, चुल सारवणे, रांगोळी काढणे जनावरांचे दुध काढणे गोठ्याची साफसफाई करणे, स्वतःच्या शेतात पुरुषांना मदत करण्यासाठी जाणे, मुलांची काळजी घेणे, स्वंयपाक करणे फावल्या वेळात शेजारच्या भगिनींशी गप्पाटंप्पा करणे यात पाउस-पाणी, धान्ये, पीक, खते, मुलांची चौकशी ह्या सारख्या गोष्टींचा समावेश असे.

विस्थापनानंतर मात्र या स्त्रियांच्या दिनक्रमांत बरेच बदल घडून आले. पुनर्वसित वसाहततीत रहायला आल्यानंतर आज ह्या स्त्रीयांना घरातील काम लवकर आटोपून दुसऱ्याच्या शेतावर मजूरीसाठी जावे लागत आहे. मजूरी करून घरी परततांना सरपण गोळा करणे, स्वयंपाकासाठी लागणारा भाजीपाला व इतर सामान त्यांना घेऊन यावे लागते. अर्थातच ह्या सर्व गोष्टी आटोपल्यानंतर शेजारच्या भगिनींशी करावयाच्या गप्पा देखील बदललेल्या दिसतात. यात विशेषतःपूर्वीचे खेडे तेथील घरे, अंगण, नदी, आताचे जीवन ह्यांची तुलना, पैशाचा प्रश्न, शेतमजूरी, मिळालेली नुकसान भरपाई कशी अपुरी आहे. आपण पुर्वीच्याच खेड्यात कसे समाधानी होतो. याच गप्पांचा समावेश होतो. याशिवाय घरातील मुख्य महिला शेतमजूरीसाठी बाहेर पडत असल्याने वृध्द स्त्रियावर घरकाम व स्वयंपाकाची जबाबदारी पडताना दिसते. अशावेळी घरातील वयात आलेली मुलगी घरकामासाठी ठेवून घेतल्याने तिला शिक्षणाला मुकावे लागत आहे.

**आरोग्यावर परीणाम**

विस्थापनापूर्वी खेड्यातील आरोग्यदायी वातावरण, अन्नधान्याची, फळे, भाजीपाला ह्यांची मुबलकता, शुध्द पाणी ह्यांमुळे कांहिसे आरोग्यदायी असलेले स्त्रीजीवन विस्थापनानंतर बरचसे बदलून गेले.

प्रत्यक्ष निरीक्षणामध्ये एका पुनर्वसित वसाहतीमध्ये असे आढळून आले की, विस्थापनाचा गंभीर परिणाम स्त्रीयांच्या आरोग्यावर झाला. विस्थापन प्रक्रियेचा ताण मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्यानंतर (गरोदर स्त्रीयाची प्रस्तुती अगोदर व गर्भाशयाची शस्त्रक्रिया) करावी लागली. याच बरोबर शेतमजूरीचे काम स्वतःस्त्रीयानां करावे लागत असल्यामुळे, पाठदुखी,



238

मुळव्याध उष्णतेचा त्रास, डोकेदुखी, पायदुखी, मुतखडा, अशक्तपणा इत्यादी. आजारांना सामोरे जावे लागत आहे. अती कष्टाची कामे, मानसिक ताण, सत्वयुक्त आहारात अभाव यामुळे विस्थापनानंतर त्यांचे आरोग्य बिघडले आहे.

**बाह्य जगाशी वाढता संपर्क**

पुनर्वसित वसाहती विशेषतः शहरालगत असल्याने विस्थापित स्त्रियांच्या बाहेरच्या जगाशी असलेला संपर्क वाढलेला दिसतो. शहराच्या सपर्कात आल्याने थोड्याफार प्रमाणात त्यांच्या वागण्यात-बोलण्यात राहणीमानात फरक झालेला आढळला.

**करमणूकीच्या साधनातील बदल**

विस्थापनापूर्वीच्या भजन, किर्तन, पोवाडा, झिम्मा-फुगडी, भारुड ह्यासारख्या करमणुकीच्या साधनात रमणाऱ्या स्त्रीयांची विस्थापनानंतर करमुणीकीची साधने बदललेली दिसली. ह्यात विशेषतः टी. व्ही., टेपरेकार्ड, डी.व्ही.डी., एम.पी.थ्री., मोबाईल, डीश टी.व्ही. ह्यांचा आनंद घेताना स्त्रीया दिसल्या संध्याकाळच्या वेळी टी.व्ही.पहाणे नित्याच्या कार्यक्रमातील एक प्रमुख कार्यक्रम बनला आहे.

**सण, समारंभाचे, जत्रांचे साजरीकरण**

विस्थापनाच्या प्रक्रियेमुळे पुनर्वसित वसाहतीमध्ये पूर्वीच्या खेड्यातील ग्रामदैवत न आणता आल्याने त्यांना दुसऱ्या पुनर्वसीत वसाहतीमध्ये ज्या ठिकाणी हे ग्रामदैवत आणले आहे त्या ठिकाणी जत्रेसाठी जावे लागते. त्यामुळे रोजच्या रोज ग्रामदैवताचे दर्शन होत नाही. त्याबद्दल पूनर्वसित स्त्रीयांची नाराजी आहे. पूनर्वसित वसाहतीत सण, उत्सव समारंभ साजरे होत असले तरी पुर्वीच्या खेड्यातील सण समारंभाचा उत्सव आता वसाहतीत येत नाही.

**राजकीय सहभाग कमी**

पुनर्वसित वसाहतीत लोकांची स्वतंत्र राजकीय प्रतिभा नाही. त्यांना ग्रामपंचायतीतील निवडणूकांसाठी उमेदवार म्हणून फारच क्वचित संधी दिली जाते. विस्थापिताबद्दल मुळच्या खेड्यातील लोकांच्या मनात उपरे आलेले लोक अशा भावना असल्याने त्यानां राजकीय क्षेत्रात म्हणावे तितके स्थान मिळत नाही. अशी एकंदरीत परिस्थितीत असताना या पार्श्वभूमीवर विस्थापित स्त्रीचा राजकीय सहभागा विषयी आपण कोणतीच अपेक्षा करू शकत नाही. त्यामूळे स्त्रीचा राजकीय सहभाग हा मतदाना पुरताच मर्यादित आहे.

**बेटी व्यवहारातील बदल**

विस्थापनाचा परिणाम प्रकल्पग्रस्तांच्या बेटी व्यवहारावरही झालेला दिसतो. प्रकल्पग्रस्त व्यक्ती आपल्या मुलीचा विवाह प्रकल्पग्रस्त कुटुंबातील वराशी निश्चित करण्याचा प्रयत्न करतो यामागे प्रकल्पग्रस्तच, प्रकल्पग्रस्तांची दुःखे समजू शकतो तसेच विवाह खर्चात अवास्तव अपेक्षा केली जाणार नाही हे मुख्य कारण.

अशा प्रकारे विस्थापीत प्रकल्पग्रस्त 'स्त्री' विकासाच्या प्रक्रियेची एक दुर्लक्षित बळीच म्हणता येईल. विस्थापित स्त्रीयांचे दुःखे त्याच्या समस्यांचा विचार पुनर्वसनाच्या आराखड्यामध्ये करावयास पाहिजे.

LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.





**सारांश**

विस्थपितांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी शासनाने कायदे केले आहेत. सामान्यपणे मोठ्या प्रकल्पाच्या निर्मितीचा प्रारंभ करतांना सर्वप्रथम शासनातर्फे पुनर्वसन अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते. म्हणजे एकीकडे प्रकल्पाच्या कामकाजला प्रारंभ होतो त्याचवेळेस पुनर्वसन अधिकारी विस्थपितांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य करीत आसतो. असे असले तरी शासकीय कार्यालयातील दिरंगाई, भावनात्मक कोरडेपणा, अकार्यक्षमता व भ्रष्ट्राचार आदी समस्यांच्या निर्मितीसाठी जबाबदार असणारी सार्मान्य स्वरुपाची कारणे आहेत असे म्हणता येते.

**संदर्भ**

१. भागर्व राजीव,(२००५), *'सीव्हील सोसायटी, पब्लीक स्पेअर अँड सीटीझनशीप'*, सेज पब्लीकेशन्स, नवी दिल्ली.
२. चौथाई ईस्मत, (२००४), *'टायनीज ग्रॅनी इन कन्टेम्पररी इंडियन शॉर्ट स्टोरीज'*: सीरीज एक, साहित्य अकॅडमी, नवी दिल्ली.
३. *http:// en.wikipedia.org/wiki/displacement.htm*
४. *http://censusindia.gov.in*
५. गुप्ता व शर्मा, (२००९), *'भारतातील विकासात्मक समस्या'*, रावत पब्लीकेशन्स, जयपूर



239